# तहसिलदार कार्यालय म्हसळा

## जिल्हा - रायगड

## लोकशाही दिन

---

सन १९९९ पासून शासन सामान्य प्रशासन विभाग यांचकडिल शासन परिपत्रक क्र.प्रसुधा-१०९९/सीआर-२३/९९/१८-अ दि.२९/१२/९९ अन्वये जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली लोकशाही दिन आयोजित करण्यात येत होता. सदर लोकशाही दिनांत नागरिकांचे तक्रारीचे निवारण झाले नाही तर जनतेला न्याय मिळण्यासाठी शासन परिपत्रक क्र.प्रसूधा/१००१/प्र.क्र.७०/२००१/१८-अ दि.१०/११/२००१ अन्वये मंत्रालय लोकशाही दिन मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात येत आहे.

त्यानंतर सदर कार्यपध्दतीत सुधारणा होऊन शासन परिपत्रक क्र.प्रसूधा/१००२/सीआर-६९/२००२/१८-अ दि.२२/७/२००२ अन्वये महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी विभागीय स्तरावर मा.विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षते खाली लोकशाही दिन आयोजित करण्यात आला आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संबंधितील नागरिकांचे तक्रारीचे निवारण जलद गतीने होण्यासाठी शासन परिपत्रक क्र.महालो/१००७/२१२/प्रक्र ५३/०७/१८-अ दि.७/११/२००७ अन्वये बृहन्मुबई, पुणे व नागपुर या महानगरपालिका मध्ये लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो. सदर दिवशी अर्जदार यांनी त्यांची तक्रार लोकशाही दिनात स्वत:सादर करावयाचे असते.

शासन परिपत्रक क्र.प्रसुधा-२०११/प्रक्र १८९/११/१८-अ दि.२६/९/२०१२ अन्वये तालुका/जिल्हा/महानगरपालिका/विभागीय/मंत्रालय स्तरावरील लोकशाही दिन अंमलबजावणीबाबत एकत्रित आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

## लोकशाही  दिन खालीलप्रमाणे आयोजित करण्यात येतो

| अ.क्र. | लोकशाही दिन स्तर | लोकशाही दिनाचा दिवस |
|---|---|---|
| १ | तालुका स्तर | प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी |
| २ | जिल्हाधिकारी/महाागरपालिका/आयुक्त स्तर | प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी |
| ३ | विभागीय आयुक्त स्तर | प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी |
| ४ | मंत्रालय स्तर | प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी |

वरीलप्रमाणे प्रत्येक स्तरावर लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो सदर दिवशी सार्वजनिक सुट्टी असल्यास त्यानंतर येणाऱ्या कामकाजाच्या दिवशी लोकशाही दिन म्हणून पाळण्यात येतो.

ज्या ज्या क्षेत्रामध्ये निवडणूकीकरीता आचारसहिंता लागू करण्यात आलेली असल्यास अशा ठिकाणी त्या स्तरावरील लोकशाही दिनाचे आयोजित करण्यात येऊ नेये. असे शासनाचे आदेश आहेत. तालुका लोकशाही दिन कार्यक्रमाचे अध्यक्ष तहसिलदार असतील जिल्हाधिकारी लोकशाही दिनामध्ये अध्यक्ष जिल्हाधिकारी, महानगरपालिका लोकशाही दिनाचे कार्यक्रमाचे अध्यक्ष संबंधित महानगरपालिका आयुक्त विभागीय स्तरावरील लोकशाही दिनाचे अध्यक्ष विभागीय आयुक्त असतील मंत्रालय लोकशाही दिनाचे अध्यक्ष मा.मुख्यमंत्री असतील वरील चारही स्तरावरील लोकशाही दिन कार्यक्रम त्या त्या स्तरावरील मुख्यालयाच्या ठिकाणी सकाळी १०.०० वाजता आयोजित करण्यात येते.

## अर्ज स्विकृती निकष

| | |
|---|---|
| १ | अर्जदार यांनी त्यांचा अर्ज विहीत नमुन्यात करावा (नमुना प्रपत्र १अ ते १ ड) |
| २ | तक्रार / निवेदन वैयक्तिक स्वरुपाचे असावे |
| ३ | चारही स्तरावरील लोकशाही दिनाकरीता अर्जदाराने अर्ज विहित नमुन्यात १५ दिवस आधी दोन प्रतीत पाठविणे आवश्यक आहे. |
| ४ | तालुका लोकशाही दिनानंतर १ महिन्याने जिल्हाधिकारी / महानगरपालिका आयुक्त लोकशाही दिनांत अर्ज करता येईल. जिल्हाधिकारी / महानगरपालिका आयुक्त लोकशाही दिनानंतर २ महिन्याने विभागीय लोकशाही दिनांत व विभागीय आयुक्त लोकशाही दिनानंतर २ महिन्यानी मंत्रालय लोकशाही दिनांत अर्ज करता येईल. |

## कोणत्या विषयावरील अर्ज स्विकारले जात नाहीत ?

| | |
|---|---|
| १ | न्यायप्रविष्ठ प्रकरणे |
| २ | राजस्व / अपिल्स |
| ३ | सेवाविषयक, आस्थापना विषयक बाबी |
| ४ | विहित नमुन्यात नसणारे व त्यासोबत आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती न जोडलेले अर्ज |
| ५ | अंतिम उत्तर दिलेले आहे/ देण्यात येणार आहे अशा प्रकरणी पुन्हा त्याच विषया संदर्भात केलेले अर्ज |
| ६ | तक्रार / निवेदन वैयक्तिक स्वरुपात नसेल तर |
| ७ | वरीलप्रमाणे जे अर्ज लोकशाही दिनाकरिता स्विकृत करता येऊ शकणार नाहीत असे अर्ज संबधित विभागाकडे आवश्यक कार्यवाहीसाठी ८ दिवसांत पाठविण्यात यावे व त्याची प्रत अर्जदारासह पुरविण्यात यावी. |

तहसीलदार म्हसळा